## संक्षिप्त

### गिरणी कामगारांनी आझाद मैदानात काढला मोर्चा

**मुंबई :** गेली २३ वर्षे कायदा असूनही कामगारांना घरे देण्यास सरकार दिरंगाई करत आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या गिरणी कामगारांनी बुधवारी आझाद मैदानात मोर्चा काढून सरकारविरोधात तीव्र घोषणा देत निषेध व्यक्त केला.मुंबईतील गिरण्यांच्या जमिनीवर अजून २० ते २२ हजार घरे कायदेशीररित्या उपलब्ध होऊ शकतात. तसेच जिल्हाधिकारी ठाणे यांनी सुचविलेल्या २१.८८ हेक्टर जमिनीवर होणारी १९ हजार घरे, शिवाय कोनगाव, पनवेल येथील इंडिया बुल्सने बांधलेली २५०० घरे आणि लॉटरीसाठी तयार असलेली एमएमआरडीएची २५२१ घरे मिळून ५० हजार घरे या घडीला सरकारची इच्छा असेल तर गिरणी कामगारांना आता मिळू शकतात, असे यावेळी संघटनेचे अध्यक्ष प्रवीण घाग यांनी सांगितले.सरकारने याबाबत निर्णय घेऊन घरे बांधणीला सुरुवात करावयाची आहे. पण सरकार चालढकल करुन गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्नावर निर्णय घेण्यास असमर्थता दर्शवित आहे, असे घाग यावेळी म्हणाले.

### गोरगरीब घटकांसाठी ओबीसी बहुजन पार्टीची स्थापना

**मुंबई :** राजकीय सत्ता हस्तगत केल्याशिवाय शोषित, पिडीत, वंचित, दलित वर्गाचे कल्याण साधले जाणार नाही. सर्वच प्रस्थापित राजकीय पक्षांची सत्तेची मक्तेदारी मोडीत काढल्याशिवाय व स्वत: राजकीय सत्ता हस्तगत केल्याशिवाय आपले प्रश्न सुटणार नाहीत. म्हणूनच 'आपलीच मते, आपलाच पक्ष, आपलाच नेता आणि आपलीच सत्ता'आणावयाची असेल, तर देशातील व राज्यातील या वर्गाला राजकीयदृष्ट्या संघटीत करण्याची व राजकीय सत्ता काबिज करण्याची गरज आहे, असे सांगत प्रकाश अण्णा शेंडगे यांनी बुधवारी ओबीसी बहुजन पार्टीची स्थापना करत पार्टीच्या नावाच्या फलकाचे अनावरण केले.मुंबई मराठी पत्रकार संघात बुधवारी आयोजित पत्रकार परिषदेत प्रकाश शेंडगे बोलत होते. तुतारी वाजविणारा पुरुष हे चिन्ह प्राथमिक स्तरावर पार्टीला मिळणार आहे. लोकसभेच्या ४८ जागा आम्ही लढवणार आहोत. यवतमाळ, नांदेड, हिंगोली, माढा, बीड, सांगलीसह इतर मतदारसंघांत उमेदवार ठरले आहेत, असे प्रकाश शेंडगे यांनी यावेळी सांगितले.

### मराठा समाजाला टिकणारे आरक्षण देण्याची मागणी

**मुंबई :** मराठा समाजाला टिकणारे आरक्षण देण्यात यावे अशी मागणी मराठा क्रांती ठोक मोर्चाचे समन्वयक रमेश केरे पाटील यांनी बुधवारी मुंबई मराठी पत्रकार संघात झालेल्या पत्रकार परिषदेत केली. मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी केरे पाटील यांच्या नेतृत्वात मुंबई मराठी पत्रकार संघात नुकतीच एक बैठक पार पडली. या बैठकीत रमेश केरे पाटील यांच्यासह रवींद्र काळे पाटील, राहुल पाटील, अनिल केरे, नरेंद्र उबाळे, अनिल कुटे, राजेश सहाने, किरण काळे पाटील, संग्राम भोसले, अविनाश मुंजाळ पाटील, पांडुरंग भुसारी, पुनम ताई लवांडे, सुरेखाताई सांगळे आणि सुनील केरे आदी उपस्थित होते.मराठवाड्यात निर्माण झालेली स्थिती पाहता राज्य शासनाने प्राप्त झालेल्या नोंदीनुसार तात्काळ कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी कायदेशीर व घटनात्मक बाबींचा विचार करून सदरचे प्रमाणपत्र देताना सरळ व सोप्या पद्धतीचा अवलंब करण्याचे निर्देश तालुका प्रशासन व जिल्हा प्रशासनास देणे अत्यावश्यक असल्याची बाबही अनेक मान्यवरांनी या बैठकीत उपस्थित केली.

### मुंबईचा पारा विशीच्या आतच

**मुंबई :** मुंबईतील किमान तापमानातील घट कायम असून सांताक्रुझ वेधशाळेमध्ये बुधवारी किमान तापमान १८, तर कुलाबा वेधशाळेमध्ये २० अंश सेल्यियस इतक्या तापमानाची नोंद झाली.सांताक्रुझ वेधशाळेमध्ये सलग दुसऱ्या दिवशी किमान तापमान विशीच्या आत राहिले. गुरुवार आणि शुक्रवारी त्यात दोन अंशांनी वाढ होईल, असे सांगण्यात आले आहे. मंगळवारी किमान तापमान ३३ अंश सेल्सियस इतके होते. काल त्याची पुनरावृत्ती झाली. गुरुवारीही तितकेच तापमान अपेक्षित आहे.कुलाबा वेधशाळेमध्ये मंगळवारी २० अंश सेल्सियस इतके कमाल तापमान होते. बुधवारी त्याचीच पुनरावृत्ती झाली. पुढील सलग तीन दिवस त्यात एका अंशाने वाढ होईल. काल किमान तापमान ३२ अंश सेल्सियस होते.कुलाबा वेधशाळेच्या अंदाजानुसार, मुंबई शहर आणि उपनगरांतील तापमानात आणखी घट अपेक्षित असून शनिवारी किमान तापमान १७ अंश सेल्सियस इतके खाली येईल.

# देशातील पहिली स्वच्छ भारत अकादमी ठाण्यात

## मुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठांतर्गत ठाण्यातील शासकीय तांत्रिक विद्यालयात देशातील पहिली स्वच्छ भारत अकादमी सुरू करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत सोमवारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ आणि बिव्हीजी अर्थात भारत विकास ग्रुप यांच्यादरम्यान सामंजस्य करार करण्यात आला.

मंत्रिमंडळ बैठकीनंतर झालेल्या या कराराप्रसंगी उपमुख्यमंत्री अजित पवार, कौशल्य व रोजगार विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा, उद्योगमंत्री उदय सामंत, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या आयुक्त निधी चौधरी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर, बिव्हीजीचे हणमंत गायकवाड आदी यावेळी उपस्थित होते.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ भारत अभियानाला एका देशव्यापी चळवळीचे स्वरुप दिले आहे. या क्षेत्रात मनुष्यबळाची कमतरता भासू नये यासाठी कुशल मनुष्यबळ विकसित करण्याची गरज निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यात स्वच्छ भारत अकादमी सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ आणि बीव्हीजी यांच्या संयुक्त विद्यमाने तरुणांना प्रशिक्षण, रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. त्यासाठी, स्वच्छ भारत अकादमीमध्ये विविध प्रमाणपत्र, पदविका आणि पदवी अभ्यासक्रम शिकवण्यात येतील. त्यासाठी विविध अभ्यासक्रमांना व प्रमाणपत्रे, पदविका व पदवी अभ्यासक्रम निश्चित करण्यात येणार आहेत. महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास नाविन्यता सोसायटी, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र कौशल्य विद्यापीठ आणि बीव्हीजी यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छ भारत अकादमीमध्ये विविध अभ्यासक्रम राबविले जाणार आहेत.

# मागासवर्ग आयोगाचे सदस्य चंद्रलाल मेश्राम यांना हटवले

**मुंबई/पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य आणि माजी न्यायाधीश चंद्रलाल मेश्राम यांना सदस्यपदावरून हटवण्यात आले आहे. मात्र आयोगाकडून त्याला दुजोरा मिळाला नाही. राज्य सरकारच्या भूमिकेविरोधात मत मांडण्यावरून यापूर्वीही आयोगाच्या काही सदस्यांना नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. त्यातूनच मेश्राम यांनाही हटवण्यात आल्याचा आरोप आयोगातील माजी सदस्यांनी केला आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गेल्या वर्षाच्या अखेरीस आयोगाला पत्र पाठवून मराठा समाजाचे सामाजिक मागासलेपण सिद्ध करण्याबाबत अभ्यास सुरू करण्यालाठी पत्र पाठवले होते. त्यानुसार आयोगाने काम सुरू केले. कामाचा व्याप लक्षात घेता आयोगात काम करणे शक्य नसल्याचे सांगत प्रा. डॉ. संजीव सोनावणे यांनी पहिला राजीनामा दिला. त्यानंतर डिसेंबर महिन्यात सर्व समाजाचे सर्वेक्षण करण्याच्या मागणीवरून मतभेद झाल्याने ॲड. बालाजी किल्लारीकर यांनी राजीनामा दिला.

त्या पाठोपाठ तीनच दिवसांनी प्रा. लक्ष्मण हाके यांनी राजीनामा दिला होता. केवळ मराठा समाजाचे सर्वेक्षण करण्याच्या राज्य सरकारच्या आदेशाच्या विरोधात भूमिका घेतल्याने ॲड. किल्लारीकर आणि प्रा. हाके यांना 'कारणे दाखवा' नोटीस बजावली होती. ही नोटीस बजावताना दीड वर्षांपूर्वी आयोगाच्या काही सदस्यांबाबत आलेल्या तक्रारींचा आधार घेण्यात आला होता. या काळात मेश्राम यांनादेखील नोटीस बजावण्यात आली होती.


**कोल्हापूर महानगरपालिका (विद्युत विभाग)**

**जाहीर फेर ई-निविदा नोटीस क्र. १२९ दि. १८/०१/२०२४ ला मुदतवाढ**

विद्युत विभागाकडून फेर ई-निविदा नोटीस क्र. १२९ कोल्हापूर शहरातील छत्रपती शिवाजी रोड, बिंदू चौक रोड, सी. पी. आर. रोड, दसरा चौक रोड आणि जयंती नाला रोड येथे डेकोरेटिव्ह विद्युत खांब बसविणे. या कामाची निविदा प्रक्रिया महाराष्ट्र शासनाच्या महा ई-निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर राबविणेत आली असून सदर कामाची प्रि-बिड मिटींग दि. २४/१/२०२४ रोजी आयोजित करणेत आली होती. सदर मिटींगमधील मुद्द्याबाबतचा सविस्तर अहवाल Common Set of Deviation चे स्वरुपात उपरोक्त संकेतस्थळावर मंगळवार दि. १३ फेब्रुवारी २०२४ रोजी प्रसिद्ध केली असून सदर निविदेस दि. २०/०२/२०२४ अखेर दु. ४.०० वाजेपर्यंत मुदतवाढ देणेत येत आहे.

**टीप :** सविस्तर टेंडर नोटीस, अटी, शर्ती वगैरे माहिती ऑफिस वेळेत सकाळी ११ ते ५ कार्यालयात तसेच वरील संकेतस्थळावर पाहणेस मिळेल.

सही/-
शहर अभियंता
कोल्हापूर महानगरपालिका


# आ. गायकवाडांसह ५ जणांची रवानगी तळोजा कारागृहात

## पोलीस ठाण्यातील गोळीबार प्रकरण; उल्हासनगर न्यायालयाने सुनावली कोठडी

**डोंबिवली : पुढारी वृत्तसेवा**

कल्याण पूर्वचे शिवसेना शहरप्रमुख महेश गायकवाड यांच्यावर झालेल्या गोळीबार प्रकरणातील आरोपी तथा भाजपाचे आमदार गणपत गायकवाड यांना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. बुधवारी सकाळी उल्हासनगरच्या चोपडा न्यायालयात त्यांना हजर करण्यात आले. यावेळी न्यायालयाने आमदार गायकवाड यांच्यासह पाच आरोपींना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. सुरक्षेच्या कारणास्तव आमदार गायकवाड व त्यांच्यासह असलेल्या आरोपींची तळोजा कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.

आमदार गायकवाड यांच्या ११ दिवसांच्या पोलीस कोठडीची मुदत बुधवारी समाप्त झाली. क्राईम ब्रँचच्या ठाणे युनिटमधील तपास अधिकाऱ्यांनी बुधवारी सकाळी नऊ वाजता आमदार गणपत गायकवाड यांच्यासह त्यांचे सहकारी आरोपी हर्षल केणे, दिव्येश उर्फ विक्की गणोत्रा, प्रसारमाध्यम प्रमुख संदीप सरवणकर, वाहन चालक रणजित यादव यांना कडक पोलीस बंदोबस्तात उल्हासनगर न्यायालयात हजर केले.

पोलिसांनी सुरक्षेच्या कारणास्तव मंगळवारी रात्रीपासून विशेष खबरदारी घेतली होती. बुधवारी सकाळी नऊ वाजता आ. गायकवाड यांच्यासह पाच आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले. तपास अधिकाऱ्यांनी आ. गणपत गायकवाड यांच्यासह आरोपींची पोलीस कोठडी वाढवून देण्याची न्यायालयाकडे मागणी केली.

### २०० मीटर परिसरात जमावबंदी आदेश

**शुक्रवारी २ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी हिललाईन पोलीस ठाण्यात गोळीबाराची घटना घडल्यानंतर आमदार गायकवाड यांना दुसऱ्या दिवशी न्यायालयात हजर केले होते. त्यावेळी न्यायालयात त्यांच्या वाहत्यांची अफाट गर्दी जमली होती. यावेळी आमदार समर्थकांनी न्यायालयाच्या बाहेर जोरदार घोषणाबाजी केली होती. तणावाचे प्रसंग टाळण्यासाठी मंगळवारी रात्रीपासून पोलिसांनी न्यायालयापासून २०० मीटर परिसरात जमावबंदी आदेश लागू केला होता. न्यायलयाच्या परिसरातील दुकाने बंद ठेवण्यात आली होती. विशेष सुरक्षा व्यवस्था न्यायालयाच्या बाहेर तैनात करण्यात आली होती.**



# राष्ट्रीय महामार्गावर प्रचंड वाहतूककोंडी

**खानिवडे : पुढारी वृत्तसेवा**

वसई-विरार पूर्वेतील मुंबई-अहमदाबाद महामार्गाच्या काँक्रिटीकरणाचे काम सध्या राष्ट्रीय रस्ते प्राधिकरण समितीने हाती घेतले आहे. हे काम सुरू असलेल्या ठिकाणी एकाच लेनमधून छोटी-मोठी तसेच अवजड वाहने ये-जा करत असल्याने प्रचंड वाहतूककोंडीचा सामना करावा लागत आहे.

दररोज किमान तास-दीड तास वाहतूककोंडीत अडकून पडावे लागत असल्याने वाहतूकदार मेटाकुटीस आले असताना मंगळवारी पहाटे पासून महामार्गावर झालेल्या प्रचंड वाहतूक कोंडीमुळे वेगवान महामार्ग दोन्ही बाजूने सुमारे चार तासांपेक्षा जास्त वेळ ठप्प झाला होता. यामुळे वसईच्या ग्रामीण भागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसह इतर विद्यार्थी, कामगार, शेतमाल नेणारे शेतकरी आणि आपल्या कामानिमित्त घराबाहेर पडलेले नागरिक आपल्या निश्चयी जागी जाण्यापेक्षा पुन्हा माघारी फिरून आपल्या घरी आल्याचे पहायला मिळाले. अश्याच स्थितीचे पुढील सहा महिने वाहतूककोंडीचे असणार आहेत. त्यामुळे पुढील सहा महिने तरी वसईकरांची वाहतूक कोंडीतून सुटका अशक्य आहे.


**जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (४), मुंबई यांचे कार्यालय**

**भंडारी सहकारी बँक, दुसरा मजला, पी. एल. काळे गुरूजी मार्ग, दादर (प), मुंबई-४०० ०२८**

**मतदार यादी अद्यावतीकरणाचा कार्यक्रम आदेश**

ईमेल :- ddrmumbai4@gmail.com / ddr_mum4@rediffmail.com दुरध्वनी क्र. ०२२-२४३६६५४

खालील नमुद सहकारी संस्थेच्या सभासदांना कळविण्यात येते की, या कार्यालयाचे आदेश दिनांक १३/०२/२०२४ अनुसार आपले सहकारी संस्थेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकी करिता मतदार यादी अद्यावतीकरणाचा कार्यक्रम व पात्र सभासदांची प्राथमिक मतदार यादी दि. १५/०२/२०२४ रोजी जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (४) यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डवर, संबंधित सहकारी संस्थेचे कार्यालय तसेच राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे संकेतस्थळ https://scea.maharashatra.gov.in यावर संबंधित संस्थेचे नावासमोरील लिंकवर ऑनलाईन पाहणेसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदर प्रारूप मतदार याद्या नमुद केलेल्या ठिकाणी कार्यालयीन वेळेत पाहणेसाठी उपलब्ध आहेत. तसेच सदर यादीबाबत काही सूचना अगर हरकती असल्यास त्या जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (४), मुंबई यांचे कार्यालयात **दि. १५.०२.२०२४ ते २६.०२.२०२४** पर्यंत (शासकिय सुट्टीचे दिवस वगळता) लेखी स्वरूपात स्विकारल्या जातील. सदर संस्थांची अंतिम मतदार यादी **दि. १५.०३.२०२४** रोजी प्रसिद्ध करण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

| अ. क्र. | विभागाचे नाव | सहकारी संस्थेचे नाव व पत्ता | ऑनलाईन लिंक |
|---|---|---|---|
| १ | आर उत्तर विभाग | ओम साईराम को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सो. लि., कुसुम भारती बिल्डिंग, शॉप नं. ५-ए, तळमजला, टाटा स्टील कंपनी समोर, दत्तपाडा रोड, बोरीवली (पुर्व), मुंबई-४०००६६ | https://scea.maharashtra.gov.in/Upload/PDF/Om%२०Sai%२०Ram%२०C0%२०Operative%२०Credit%२०Soc_२_१४_२०२४%२०२_०७_१४%२०PM.pdf |
| २ | पी विभाग | ज्ञानसागर को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सो. लि., २१, एकता को - ऑप. हौ. सो., त्रिकोणी मैदान रोड नं. १, तीन डोंगरी, गोरेगाव (प), मुंबई - ४०००६२ | https://scea.maharashtra.gov.in/Upload/PDF/Dnysagar%२०Co%२०Op%२०Credit%२०Soc%२०Primary%२०Voter%२०list%२०Prog_२_१४_२०२४%२०२_०८_५९% २०PM.pdf |
| ३ | पी विभाग | धी राज्य राखीव पोलिस बल गट क्र.८ को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. मुंबई, गोरेगांव (पुर्व), मुंबई-४०००६५ | https://scea.maharashtra.gov.in/Upload/PDF/The%२०Rajya%२०Rakhiv%२०Police%२०Bal%२०Gat%२०No%२०Credit%२०SocBorivali%२०Esst,%२०Mumbai%२०६६ _२_१४_२०२४%२०२_१०_०४%२०PM.pdf |
| ४ | पी विभाग | शिवसमृद्धी नागरी सहकारी पतसंस्था मर्या. मुंबई, शिवभक्त मित्रमंडळ, तीन डोंगरी, जुने हनुमाननगर, गोरेगाव (प), मुंबइ-४०००९० | https://scea.maharashtra.gov.in/Upload/PDF/Shivsmridhhi%२०Nagari%२०Patsantha%२०Primary%२०Voter%२०list%२०prog_२_१४_२०२४%२०२_०८_१६%२०PM.pdf |
| ५ | पी विभाग | श्री बालाजी सहकारी पतपेढी मर्या. मुंबई, माऊली सफायर, तळमजला, रुम नं. १, बायशेत पाडा-२, कुरार गाव, मालाड (पुर्व), मुंबई - ४०००९७ | https://scea.maharashtra.gov.in/Upload/PDF/Shri%२०Balaji%२०Co_op%२०Credit %२०Soc%२०Primary%२०Voter%२०List%२०Prog_२_१४_२०२४%२०२_१४_०९%२०PM.pdf |

ठिकाण : मुंबई
दिनांक : १४/०२/२०२४

शिक्का

स्वाक्षरित/-
जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (४), मुंबई



**एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड**
(आधीची एल&टी फायनान्स लि, स्कीम ऑफ अमालगमेशन अंतर्गत एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लि. शी संलग्न होऊन ज्याची अंमलबजावणी 4 डिसेंबर 2023 रोजी झाली)
**नोंदणीकृत कार्यालय:** नोंदणीकृत कार्यालय: एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177 कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
**CIN No.:** U65910WB1993FLC060810
**शाखा कार्यालय:** डोंबिवली

L&T Finance

**तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव**

एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेडचे अधिकृत अधिकारी वित्तीय मालमत्ता पुनर्रचना आणि अनामत व्याजाची सक्तवसुली कायदा, 2002 (2002 चा 54) अंतर्गत आणि सदर कायद्यांतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून आपली थकबाकी आणि पुढील व्याज, आकार आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **''सार्वजनिक ई-लिलावाद्वारे''** **''जिथे आहे जसे आहे तत्वावर''** आणि **''ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत तत्वावर''** खालील मालमत्तेचा ई-लिलाव करीत आहेत.

| कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव | तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता | कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक) | भौतिक ताबा घेतला | बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये) | एकूण शिल्लक थकबाकी 12.02.2024 नुसार | आरक्षित किंमत (रुपयांमध्ये) | आरंभाची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. इंद्र आर पांडे 2. नेहा इंद्र आर पांडे | मालमत्तेचा पत्ता- फ्लॅट क्र. 1106, 58.08 चौ.मी. व्हर्सटाइल व्हॅली म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीच्या डी विंगमध्ये 11व्या मजल्यावर रेरा चटईक्षेत्र, जुना सर्व्हे नंबर 11/9 आणि नवीन सर्व्हे क्र. 12/9, गाव- निळजे, तालुका कल्याण, जिल्हा ठाणे, निळजे ग्रामपंचायतीच्या हद्दीत, डोंबिवली (ई), कल्याण, महाराष्ट्र – 421204. | H04884230123055620, H04884230123055620G, H04884220223023657, H04884220223023657G | 13 नोव्हेंबर 2023 | रु. 5,23,404/- | रु. 1,42,16,842.67/- | रु. 52,34,040/- | सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी 10.00 ते संध्याकाळी 5.30 पर्यंत | 04-03-2024 |
| 1. इंद्र आर पांडे 2. नेहा इंद्र आर पांडे | मालमत्तेचा पत्ता- फ्लॅट क्रमांक 2002. मोजमाप 58.08 चौ. मीटर व्हर्सटाइल व्हॅली म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीच्या सी विंगमधील 20 व्या मजल्यावरील रेरा चटईक्षेत्र, जुना सर्व्हे नंबर 11/9 आणि नवीन सर्व्हे क्रमांक 12/9, गाव- निळजे, तालुका कल्याण, जिल्हा ठाणे, निळजे ग्रामपंचायतीच्या हद्दीत, डोंबिवली (इ) कल्याण, महाराष्ट्र- 421204. | H04884230123055620, H04884230123055620G, H04884220223023657, H04884220223023657G | 13 नोव्हेंबर 2023 | रु. 5,23,404/- | रु. 1,42,16,842.67/- | रु. 52,34,040/- | सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी 10.00 ते संध्याकाळी 5.30 पर्यंत | 04-03-2024 |

**सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम**

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना 02/03/2024 रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुरावायचंय्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10 टक्के परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTHF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे 04/03/2024 रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे 05/03/2024 भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुसार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेची तपासणी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार अधिकृत अधिकाऱ्यांशी संपर्क साधू शकतात उदा., **नाव - हरिलाल गुप्ता, संपर्क क्रमांक 8080302861, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड, कार्यालय: 6वा मजला, वृंदावन बिल्डिंग, प्लॉट क्रमांक 177, कलिना , सीएसटी रोड, मर्सिडीज शोरूमजवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098,आणि संतोष तिवारी, संपर्क क्रमांक 9920490126, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड, कार्यालय: 6वा मजला, वृंदावन बिल्डिंग, प्लॉट क्रमांक 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरूमजवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098.** ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता आणि कोणतीही पूर्वसूचना न देता बोली/ऑफर स्वीकार/नाकारू/सुधारू/रद्द करू शकतो किंवा ई-लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी, कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8(6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/ गॅरेंटर (एक/अनेक)/ मॉर्टगेजर (एक/अनेक)/ सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

**दिनांक:** 15.02.2024
**ठिकाण:** डोंबिवली

स्वाक्षरी/-
**अधिकृत अधिकारी**
करिता एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड


### विदर्भात पाऊस, इतरत्र थंडी

**पुणे :** मध्य महाराष्ट्रावर असलेली चक्रीय स्थिती आणि मध्य प्रदेश ते उत्तर प्रदेशदरम्यान असलेला कमी दाबाचा पट्टा या स्थितीमुळे विदर्भात पाऊस पडण्याची शक्यता आहे. मात्र, उर्वरित राज्यातील मराठवाडा, मध्य महाराष्ट्रात थंडी राहील, तर कोकणात हवामान कोरडे राहील, असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. दरम्यान, बुधवारी राज्यात सर्वात कमी तापमानाची नोंद पुणे येथे १३.९ अंश सेल्सिअस एवढी झाली आहे.


**बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, सांगली.**

जाहीर संक्षिप्त ई-निविदा सूचना क्रमांक ३२ सन २०२३-२४ (NIT)

कार्यकारी अभियंता (इवद) जिल्हा परिषद सांगली

जाहीर ई-निविदा सूचना क्र. - ३२ सन २०२३-२०२४

कार्यकारी अभियंता (इवद) जिल्हा परिषद, सांगली या विभागाकडील विविध योजनांतर्गत एकूण ०६ कामांची ई - निविदा क्र. - ३२ सन २०२३/२०२४ ही सांगली जिल्हा परिषद सांगलीकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून दोन लिफाफे पद्धतीने मागवीत आहे. ई-निविदा in.gov.mahatenders.www//:http या संकेत स्थळावर सर्व कामे दिनांक १४/०२/२०२४ रोजी दुपारी १७.०० वाजलेपासून दिनांक २१/०२/२०२४ रोजी दुपारी १७.०० वाजेपर्यंत प्रसिद्ध करणेत येत आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता (इवद)
जिल्हा परिषद, सांगली



**एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड**
(आधीची एल&टी फायनान्स लि, स्कीम ऑफ अमालगमेशन अंतर्गत एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लि. शी संलग्न होऊन ज्याची अंमलबजावणी 4 डिसेंबर 2023 रोजी झाली)
**नोंदणीकृत कार्यालय:** एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
**CIN No.:** L67120MH2008PLC181833
**शाखा कार्यालय:** मुंबई

L&T Finance

**ताबा सूचना**
[नियम-8(1)]

जसे की, खालील स्वाक्षरी करणार एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेडचा (आधीचे नाव: एल&टी हाउसिंग फायनान्स लि. ही एल&टी हाउसिंग फायनान्स लि. सोबत विलीन झाली आहे (एकत्रीकरणाच्या योजने अंतर्गत ज्याला एनसीएलटी मुंबई आणि एनसीएलटी कोलकाता ह्यांनी मान्यता दिली आहे, दिनांक 12 एप्रिल 2021 पासून एल&टी फायनान्स लिमिटेडमध्ये विलीन झाली आहे आणि आता एल&टी फायनान्स लिमिटेड ही दिनांक 4 डिसेंबर 2023 पासून एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेडमध्ये विलीन झाली आहे) अधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेटस आणि एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियम, 2002 [नियम 3] सोबत वाचले असता सदर कायद्यातील कलम 13(12) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून एक मागणी सूचना जारी केली असून त्याद्वारे कर्जदार/सहकर्जदार आणि गॅरेन्टर्स यांना सदर सूचना मिळाल्यापासून 60 दिवसांचे आत खाली नमूद करण्यात आलेल्या मागणी सूचनेत नमूद करण्यात आलेली रक्कम व मागणी सूचनेच्या तारखेपासून ते पैसे भरेपर्यंत/वसूल होईपर्यंत त्यावरील अधिक व्याज आणि इतर शुल्क इतक्या रकमेची परतफेड करण्यास सांगितले होते. कर्जदार/सहकर्जदार आणि गॅरेन्टर्स यांनी सदर रकमेची परतफेड न केल्यामुळे ह्याद्वारे कर्जदार/सहकर्जदार आणि गॅरेन्टर्स यांना आणि सर्वसाधारण जनतेला ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की खालील स्वाक्षरी करणार यांनी ह्या सूचने संदर्भात सदर नियम कमल 8 सोबत वाचले असता सदर कायद्यातील कलम 13 अन्वये त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून येथे खाली वर्णन करण्यात आलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

| कर्ज खाते क्रमांक | कर्जदार/सहकर्जदार आणि गॅरेन्टर्सचे नाव | गहाण मालमत्तेचा तपशिल | मागणी सूचना: दिनांक | मागणी सूचना: थकित रक्कम (₹) | ताबा घेतल्याची तारीख व प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| H18565140621025400 & H18565140621025400L | 1. इशाक मोहम्मद ताज मोहम्मद खान 2. शाहजहान इशाक खान | मालमत्तेचा सर्व तुकडा आणि पार्सल पत्ता: फ्लॅट क्रमांक 501, ए विंग मध्ये, 5 व्या मजल्यावर, सुमारे 38.73 चौ. मीटर कार्पेट क्षेत्रफळ, मंजिरी हाईट्स म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीत आहे. बदलापूर गावातील भूखंड एस. क्रमांक 185/7 आणि जागा, ता. अंबरनाथ, जि. ठाणे. कुळगाव बदलापूर नगरपरिषदेच्या हद्दीत, कुळगाव. | 08-12-2023 | 06-12-2023 रोजी रु. 45,26,375.53/- | 09-02-2024 प्रत्यक्ष ताबा |

कर्जदार/सहकर्जदार आणि गॅरेन्टर्स यांना खास करून आणि सर्वसाधारण जनतेला याद्वारे सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार न करण्याची खबरदारीची सूचना देण्यात येत आहे आणि सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार केल्यास तो एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड यांना मागणी सूचनेत नमूद करण्यात आलेली रक्कम आणि त्यासोबत मागणी सूचनेपासून ते पैसे अदा करेपर्यंत/वसूल होईपर्यंत अधिक व्याज व इतर शुल्क इत्यादी भरण्याच्या अधीन असेल.

**दिनांक:** 15.02.2024
**ठिकाण:** मुंबई

स्वाक्षरी/-
**अधिकृत अधिकारी**
करिता एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड